# मुं.मे.रे. कार्पोरेशनतर्फे सर्व साइट्सवर मान्सूनपूर्व कामे सुरू

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

मुंबईतील पहिल्या भुयारी मार्गाची अंमलबजावणी करीत असलेले मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन (मुं.मे.रे.कार्पो.) मान्सून काळात पाणी साचू नये, याकरिता उपाययोजनांसह सज्ज आहे. मुंबई महानगरपालिकेच्या वतीने या पूर्वीच मान्सूनसंबंधित घ्यावयाच्या खबरदारीच्या सविस्तर सूचना सर्व अभियंते तसेच कंत्राटदारांना जारी केल्या आहेत. मान्सूनपूर्व उपाययोजना करणे तसेच पावसाळ्याच्या कालावधीत तयारी सुनिश्चित करण्याचे निर्देश महापालिकेच्या वतीने देण्यात आले आहेत. त्यानुसार मुं.मे.रे. कार्पोरेशनचे अभियंते आणि कंत्राटदारांनी सर्व साइट्सवर मान्सूनपूर्व होणारी कामे सुरू केली आहेत. ही सर्व कामे मान्सून आगमनापूर्वी पूर्णत्वास येणार आहेत.

पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी पर्जन्य जलवाहिन्या स्वच्छ करणे, त्यातील गाळ काढून टाकणे तसेच कॅच पिट्स बांधणे अशी कामे प्रगतीपथावर आहेत. याशिवाय पावसाळ्यात वाहतुकीमध्ये अडथळा येऊ नये, यासाठी सर्व बाजूंचे दिशादर्शक, चेतावणी चिन्हे, वाहतूक चिन्हे यांची नव्याने रंगरंगोटी करण्याचे काम सुरू असून बॅरिकेट्सवर ब्लिंकर्स साइट्सवर उपलब्ध केले जातील. बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणांवर प्रभाव क्षेत्रामध्ये बॅरिकेड्सची दृश्यमानता वाढविण्यासाठी त्याची देखभाल केली जाईल. सुरक्षिततेच्या कारणास्तव पादचाऱ्यांकरिता उपलब्ध असलेल्या रेलिंगवर रिफ्लेक्टिव्ह स्टिकर्स लावण्यात येणार आहेत. तसेच साइट्सवर नियमितपणे वीजेच्या तारा, केबल वायर्स यांसारख्या विद्युत वाहिन्यांचे ऑडिट केले जाणार आहे. पावसाळ्यात विद्युत आणि दळणवळण व्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी मुं.मे.रे.का. संबंधित संस्थांसोबत समन्वय साधणार आहे. तसेच बांधकामस्थळी साठलेल्या पाण्यामुळे डासांची पैदास होऊ नये, यासाठी विशेष काळजी घेण्यात येणार आहे. सर्व ठिकाणी पुरेशी रोषणाई करण्यात येणार असून रस्त्यांवरील खड्डे व खराब पॅच ओळखून दुरुस्तीची कामे हाती घेण्यात आली आहेत. तसेच खराब झालेल्या गटारांची झाकणे बदलण्याचे कामही सुरू आहे. "मुंबई महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार मुं.मे.रे. कार्पोरेशन समन्वय साधून मान्सून काळातील घ्यावयाच्या तयारीवर काम करीत आहे.